MHKO100001142026

**नियमीत दिवाणी दावा क्र. २६/२०२६**

शंकर चौगुले
//वि//
गुडूसाब छेडेदार.

**निशाणी क्र. १९ वर आदेश**

वादी यांनी सदर अर्ज न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती करुन दावा मिळकतीचे मोजमापासह बांधकामाची सत्य वस्तुस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करुन तसा हातनकाशासह अहवाल सादर करणेकरीता दाखल केला आहे.

०२. वादी यांनी असे कथन केले आहे की, आप्पाण्णा मल्लाप्पा चौगुले यांनी प्रतिवादीचे पूर्वहक्कदार हुसेन छेडेदार यांना खरेदीपत्राने १ आर क्षेत्र खरेदी दिले आहे. या क्षेत्राशिवाय गट क्र.१००७ मध्ये त्यांचा कोणताही संबंध नाही. असे असताना प्रतिवादी दावा मिळकतीत अतिक्रमण करुन बांधकाम करत आहेत. त्याबाबत फोटो त्यांनी हजर केले आहेत. त्यामुळे, सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर येऊन न्यायदान सुलभ होणेसाठी न्यायालयीन आयुक्त म्हणुन मा. उपअधिक्षक भूमी अभिलेख, गडहिंग्लज किंवा विधीज्ञ यांची नियुक्ती करणेत यावी असे कथन केले आहे.

०३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी निशाणी क्र.२५ वर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, दावा मिळकत वादीच्या मालकी वहिवाटीची आहे असे कथन वादीने केले आहे. परंतु, वादीने त्याबाबत दावा मिळकतीचा मालमत्ता पत्रकाचा उतारा, नकाशा किंवा चौकशी उतारा असा कोणताही कागद हजर केला नाही. दावा मिळकतीची मोजणी करुन दावा दाखल केला नाही. दावा मिळकतीचा सिटी सर्वे झाला असल्याने त्याच्या चतु:सिमा व नकाशा स्पष्ट आहे त्यामुळे न्यायालयीन आयुक्त नेमण्याची गरज नाही. दावा मिळकतीचा ताबा देखील वादीकडे नाही त्यामुळे न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करुन दावा मिळकतीचा ताबा ठरविता येणार नाही. दावा मिळकत वादीच्या मालकीची नाही हे सिटी सर्वे चौकशीच्या उता-यावरुन स्पष्ट होते. अशा परिस्थितीत दावा मिळकतीमध्ये चालू असलेल्या बांधकामाबाबत मोजणी करुन नकाशासह अहवाल मागणी करण्याचा हक्क वादीस नाही. म्हणुन सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

०३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जातील व म्हणण्यातील कथनांप्रमाणे युक्तीवाद केला.

०४. वादीतर्फे दाखल करण्यात आलेला तुर्तातूर्त मनाई अर्ज गुणदोषावर नामंजुर करण्यात आला आहे. वादींनी सदर दावा कायम मनाई आदेश व आज्ञार्थी मनाई आदेश मिळविण्याकरीता दाखल केला आहे. सदर आदेश मंजुर करणेसाठी दावा मिळकत वादीच्या मालकी व वहिवाटीची आहे हे वादीस सिध्द करावे लागणार आहे. दाव्याची चौकशी अदयाप सुरु झालेली नाही. दावा मिळकतीची मालकी व वहिवाट सिध्द करण्यासाठी वादीला पुरावा दयावा लागणार आहे. न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक दावा मिळकतीचे मोजमाप करण्यासाठी व त्यामधील बांधकामाची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्यासाठी केली तर वादीस पुरावा गोळा करण्याकरीता मदत केल्यासारखे होणार आहे.

०५. वादीस दावा दाखल करताना दावा मिळकतीची मोजणी करुन त्याबाबतच्या अहवालासोबत दावा दाखल करता आला असता. वादीने दाव्यात पुरावा देण्यापूर्वी वर नमुद केलेल्या चर्चेनुसार न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करता येणार नाही. त्यामुळे, सदर अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालील आदेश पारित करत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.04.23 15:07:38 +0530

डी. एम. पवार
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २३/०४/२०२६.